


# मनोहारी सुसंवादिनीचे जनक

'बाजाची पेटी' किंवा 'हार्मोनियम' या रूढ नावांनी आपण ज्या वाद्याला ओळखतो ते वाद्य मूळात परदेशी आहे हे ऐकून तुमच्यापैकी बऱ्याचजणांना आश्चर्यमिश्रित आनंद होईल. आश्चर्य अशासाठी की, परदेशी जडणघडण असलेले हे वाद्य हिंदुस्थानात इतके रुळले की आज गाण्याच्या (काही ठिकाणी वादनाच्याही) प्रत्येक मैफलीत त्याशिवाय पानही हलू नये ? आणि आनंद अशासाठी की प्रत्येक बाबतीत (लोकसंख्या वाढीव्यतिरिक्त) आपण इतर देशांच्या मागे पडत असताना एका परदेशी वाद्याला आपले संगीत गायला लावले. (कशी जिरविली गोऱ्यांची) असो.

- ज्ञानदा -


'बाजाची पेटी' किंवा 'हार्मोनियम' या रूढ नावांनी आपण ज्या वाद्याला ओळखतो ते वाद्य मूळात परदेशी आहे हे ऐकून तुमच्यापैकी बऱ्याचजणांना आश्चर्यमिश्रित आनंद होईल. आश्चर्य अशासाठी की, परदेशी जडणघडण असलेले हे वाद्य हिंदुस्थानात इतके रुळले की आज गाण्याच्या (काही ठिकाणी वादनाच्याही) प्रत्येक मैफलीत त्याशिवाय पानही हलू नये ? आणि आनंद अशासाठी की प्रत्येक बाबतीत (लोकसंख्या वाढीव्यतिरिक्त) आपण इतर देशांच्या मागे पडत असताना एका परदेशी वाद्याला आपले संगीत गायला लावले. (कशी जिरविली गोऱ्यांची) असो.

१८४० साली अलेक्झांडर डेबेन याने पहिली हार्मोनियम तयार करून त्याचे पेटंट घेतले. अण्णासाहेब किर्लोस्करांनी १८ नोव्हेंबर १८८२ रोजी 'सौभद्र' नाटकाचा पहिला प्रयोग सादर केला. त्यात 'दादा मोडक यांनी पायपेटीची जबाबदारी सांभाळली', असा उल्लेख आढळतो.

एकूणच हार्मोनियमला आपण आपले मानले. तिचे 'सुसंवादिनी' असे बारसे करणारे ज्येष्ठ गायक आणि श्रेष्ठ हार्मोनियमपटू पं. मनोहर चिमोटे यांच्याशी गुढीपाडव्याच्या शुभदिनी बातचीत करण्याचा योग आला. त्याचा हा सारांश ...

**□ हार्मोनियम या वाद्याकडे आकर्षित व्हायला काय कारण घडले?**

पं. चिमोटे : वास्तविक माझे वडील कारखानदार, खाणमालक. नागपूर जवळच्या परिसरातील मँगेनीज धातूच्या खाणी आमच्याकडे होत्या. त्यामुळे घरची सांपत्तिक परिस्थिती उत्तम होती. नागपूरच्या एका गल्लीला 'चिमोटे गल्ली' असेच नाव आहे कारण तिथली सगळी घरे आमचीच होती. अशी श्रीमंती असूनही राहण्यासारखी होती. ते देवभक्त होते. भजने म्हणण्याची त्यांना खूप आवड. त्यामुळे घरात संगीताची वाद्ये होती आणि दर गुरुवारी घरीच भजनाचा कार्यक्रम होत असे. आमच्या घरात संगीताचा अभ्यास तसा कोणीच करीत नसे. आपल्या कुळयातरी मुलाने गाणे, वादन शिकावे आणि आपल्याला साथसंगत करावी असे त्यांना सारखे वाटे म्हणून त्यांनी आम्हा चार भावांत नेमणूक केली ती माझीच. तोवर माझ्यात संगीत शिकण्याचे काही गुण आहेत किंवा आपल्याला संगीताची साधना जमेल असे मला अजिबात वाटले नव्हते. केवळ वडिलांच्या इच्छेखातर मी या बाजूला वळलो. मात्र, नंतर संगीताची इतकी गोडी लागली की मी त्यातच रुळलो. भजनाला साथीला जे कोणी येत ते पायपेटी घेऊन बसले की मी हातपेटी



घेऊन त्यांच्या शेजारी बसायचो. तिथून खरी सुरुवात झाली. कुठेही न शिकता मला पेटी वाजवता येऊ लागली. हे कसे येत गेले ते मलाही सांगता यायचे नाही. मग वडिलांनी मला एका गायनशाळेत पाठवले. तिथे फक्त अर्धा दिवस मी गेलो असेन. पण तिथे जाऊन काही शिकावे, शिकता येईल हे स्वीकारण्यासाठी माझे मनच तयार नव्हते. त्यावेळी मला काय शिकायचेय, कोणत्या दर्जाचे शिकायचेय याची कल्पना नव्हती पण काय नकोय हे मात्र कळत होते. त्या काळात भास्करबुवा नागपूरात येतील तेव्हा तू त्यांच्याकडे जा' असे मला माझ्या चुलत भावाने सांगितले. नागपूरातले श्रीमंत म्हणून ओळखले जाणारे बापूसाहेब चिटणीस यांच्याकडे ते एकदा आल्याचे मला समजले. बापूसाहेब त्यांच्याकडे शिकतही असत. मग मी त्यांना आमच्या घरी आणले. आमच्या घरी ते फार कमी दिवस राहिले आणि तितक्या कालावधीत मी त्यांच्याकडे जे शिकलो तेच माझे शिक्षण. यामुळे मला मात्र हार्मोनियमचे वेड लागले ते कायमचेच !

**□ नागपूर सोडून मुंबईला येऊन आजमावून पहावे असे का वाटले ?**

पं. चिमोटे : १९५० पर्यंत मी नागपूरलाच होतो. आता फक्त हार्मोनियमवरच लक्ष केंद्रित करायचे मी ठरवले होते. नागपूरला जेवढे गायक येत त्यांना मला साथ करण्याचे भाग्य लाभले. त्यामुळे मी नागपूरातला चांगला संगतकार झालो. पण मनात सारखे वाटे की हे 'वासरांत लंगडी गाय शहाणी !' काही बरोबर नव्हे. आपल्याला अधिक शिकायचे असेल तर इथून बाहेर पडायला हवे. नागपूर-अमरावतीचा कलावंत तिथे विशेष स्पर्धा नसल्याने मुंबईकडे धाव घेतो. त्या सुमारास वडील वारल्याने मालमत्तेविषयक भांडणे, भाऊबंदकी सुरु झाली. त्या सर्वांना कंटाळून एके दिवशी अमरावतीहून आणि ट्रंक घेऊन मी

**□ मग मुंबईला नामवंत कलावंताकडून मार्गदर्शन वगैरे मिळाले असेलच !**

पं. चिमोटे : तसे घडले नाही. मी मुंबईला आलो ते साल होते १९५०. त्या अगोदर दोन वर्ष मी मुंबईला आलो होतो. आमचे गुरुजी मात्र नागपूर सोडून कराचीला गेले होते. तिथून फाळणीच्या सुमारास ते मुंबईत आले. हे कळल्याने त्यांना भेटायला म्हणून १९४८ साली मी मुंबईत आलो होतो. वेदीजींबरोबर एक निमकर नावाचे गृहस्थ असत. त्यांच्याशी त्यावेळी ओळख झाली होती. त्यामुळे ५० साली मुंबईला आल्यावर आता कुणाच्या घरी जायचे असा प्रश्न जेव्हा उभा राहिला तेव्हा त्या निमकरांचा जपून ठेवलेला पत्ता घेऊन तो हुडकत-हुडकत लॅमिंग्टन रोडवरच्या तारा टेंपल लेनमध्ये आलो. तिथल्या लक्ष्मी नारायणाच्या मंदिराचे निमकर हे पुजारी. मंदिरामागे एका छोट्या जागेत त्यांचे संपूर्ण कुटुंब रहायचे. त्यांनी देवळात झोपायची परवानगी दिल्याने मी मुंबईत राहू लागलो. मग २-३ वर्ष, कधी याच्या घरी रहा तर कधी कुणाच्या गच्चीवर झोप अशा पद्धतीने मी व्यतित केली. जवळचे पैसे संपून गेले होते. कुणी ओळखीचे भेटले तर निदान चहातरी फुकटात प्यायला मिळेल अशी परिस्थिती आली. संगीताच्या शिकवण्या त्यातूनच सुरु झाल्या. मग एक संगीतप्रेमी पवार नावाचे गृहस्थ मला डॉकयार्ड रोडवरील त्यांच्या घरी रहायला घेऊन गेले. आयुष्याला थोडी स्थावरता आली.

**□ तो काळ म्हणजे मराठी संगीत रंगभूमीचा उत्कर्ष काल होता. मग हार्मोनियम-ऑर्गन साथ करायला जावे असे कधी वाटले नाही का ?**

पं. चिमोटे : तशी थोडीफार साथ तो प्रकार मला आवडला नाही, पटला नाही. आज अखिल भारतीय पातळीवर संगीताच्या विविध क्षेत्रात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल असा